# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in    Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहीर सूचना

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/२०१९/३५ 243

दिनांक : १५ जानेवारी, २०१९ 16 JAN 2019

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2019-20] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०१९-२० मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक १४.०१.२०१९ ते दि. ०३.०२.२०१९ पर्यंत व विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१९-२० च्या तरतूदीनुसार) दंड भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०८.०२.२०१९ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे, त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. ०३.०२.२०१९ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि ०८.०२.२०१९ पर्यंत भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२०, पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट अॅंड केटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरु करणाऱ्या संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

२. विद्यमान व शै.व. २०१९-२० पासून नव्याने सुरु होणाऱ्या संस्थानी दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे अदा करण्यात यावे. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करतांना प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

i. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट अॅंड केटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. हे व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरु करणे.

ii. एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणाऱ्या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे

iii. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.

iv. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.

v. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरु करणे.

[illegible]

श्री मोरे / श्री शिंदे

RO च्या website वर प्रसिद्ध करणे

[illegible]

vi. एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या एका परिसरातील संस्था विलिन करणे [Mergering]

vii. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व व्याउलट

viii. विद्यमान संस्था बंद करणे

ix. विद्यमान संस्था बंद करुन तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे

x. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे

वरील अर्जाची प्रत (Hard Copy) संबंधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या दुस-या किंवा दिनांक ०३.०२.२०१९ यापैकी जे अगोदर असले त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "-------------------------" (प्रस्तावाचा विषय) नमूद करावा.

४. परिच्छेद क्रमांक ३(i) व ३ (ii) समोर नमूद केलेल्या प्रस्ताव / अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयात सुनावण्या घेण्यात येतील. सुनावण्यांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येईल.

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीन जाहिर सूचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेले अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळी उपलब्ध करुन दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थाना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाचे संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्य प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह (मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे जमा करण्यात यावी.

६. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीताच्या मान्यतेसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करुन दिलेल्या लिंक वरती माहिती भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे स्तरावरील औपचारीक कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थाना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

जा.क्र.तंशिविकापु/विवि/मान्यता/२०१९/

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
४१२-ई, शिवाजीनगर पुणे-१६.
दिनांक :

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रसिध्द केलेल्या वरील जाहीर सूचनेतील मुद्यांच्या अनुषंगाने, योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. याबाबत काही अडचणी आल्यास, त्यांनी अधिक माहितीसाठी या विभागीय कार्यलयाशी संपर्क साधावा.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधित संस्था.